## * खंड 10 वा *

श्री रामाची धर्म कहाणी । श्रेष्ठ त्याग की भोग जी वनी ।।
जिथे त्यागमय जी वन श्रध्दा । पाप ताप ना तिथे आपदा ।।
आपदेत त्या सत्व परी क्षा । आपदेत त्या स्वधर्म दी क्षा ।।
धर्म तारितो कर्म चुकेना । चुकल्या जी वा मार्ग मिळेना ।।
कर्मगती चे जगात बंधन । बंधनात त्या जी व भ्रमे पण ।।
त्याच भ्रमावर मात करिति जे । की र्ति तयाची जगात गाजे ।।
तोच श्रेष्ठ जगि जी व जिनेश्वर । धर्म तयाचा त्याग मनोहर ।। 1

कर्मगती ची अगाध ली ला । कर्म भ्रमविते भल्या भल्याला ।।
भ्रम बुध्दी ने राज्य नासते । भ्रम बुध्दी ला विश्व हासते ।।
विश्व संगरी नित्य नवे रण । चुकेन मृत्यू लाभ हानि पण ।।
लाभ हानि ती जया न बाधे । तयालाच जगि स्वधर्म साधे ।।2

धर्म तिथे जय तोच महात्मा । निजानंद मति तो परमात्मा ।।
प्रसन्न आत्मा प्रसन्न जी वित । भोग बुध्दिने होत कलंकित ।।
जगि अकलंकित धर्म बुध्दिती । सदैव राहे सदैव होती ।।
आज काल वा आज उद्यामधि । जी व भ्रमति हे जगि लक्षावधि ।।
त्या लाखातिल एक जी व तो । प्रपंचात या विजय मिळवितो ।। 3

भव सिंधूतिल ज्ञान दी प ते । मुक्त महात्मे सदा सुखी ते ।।
सुख दु:खाची जिथे क्षिती ना । धर्म मार्ग तो त्याग भावना ।।
त्या त्यागाचे राज्य भूवरी । अशांततेची तथा शिसारी ।।
ती च नाचते जगात सांप्रत । अहं बुध्दिची तिथे करामत ।।
जळेल जेव्हा जगी अहंता । तिथेच शांती तिथेच समता ।।
त्या समतेची जया न महती । तेच जी व जगि पाप प्रकृती ।। 4

पाप प्रकृती कौरव सेना । जगू देईना पंडु सुताना ।।
कौरव पांडव युध्द मातले । धर्म तिथे जय जगास कळले ।। 5

श्री रामाची ही कथा केवळ कथा नाही . ती एक धर्ममय जी वनाची क था आहे. धर्म जो रामाच्या जी वनांतून स्त्रवला, त्याच्या सवें चालला, बोलला, राहिला. त्याग श्रेष्ठ की भोग श्रेष्ठ असा वादही तेथे नव्हता. त्याग आणि भोग यांचा समिचे न, सम्यक्, सुंदर मिलाप तेथे होता. घ्त्यवतेन भुंजी था:ञ्अशी जी वन श्रध्दा होती , श्रध्दा ही सुवासाप्रमाणे आहे. तिचा सुगंध जी वनांत दरवळतो. मग पापकर्मांनी उदित झालेली पापे असोत की पुण्ये असोत त्या ठिकाणी एक अ-कर्ता-भावच उरतो. आपत्ती आपत्ती राहात नाही त्या आपदा देखी ल सत्वशी ल जी वनाचा नवा निखार, नवे लेणे चढवून जाते. स्व-धर्माचा साक्षात्कार तेथे घडतो. धर्म एक नाव बनून जाते. कर्मफलांची सत्ता तेथे रहाते. पण जे कर्मफलात रस घेतात ते पुन: मार्गभ्रष्ट होतात. पुन:भ्रमण, ज्या भ्रमणातून जो सुटतो तोच श्रेष्ठ. त्याचे जी वन श्रेष्ठ, त्याची श्रध्दा, ज्ञान, चारित्र्य श्रेष्ठ. त्याचा त्याग आणि भोग ही श्रेष्ठ कारण त्यात तो अ-कर्ता असतो.

या जी वनात ज्या कांही विचित्र गोष्टी घडून येतात, सुख-दु:खे भोगावी लागतात, भल्या-भल्यांना भ्रम व्हावा अशी स्थिति येते ती कर्मोदयामुळेच. ही जी मानवी जीवनाची शोकांतिका आहे ती त्या अज्ञानमय भ्रमामुळेच. सारे रण माजते, युध्दे होतात, ती सारी भ्रमणामुळेच. लाभ-हानी , जन्म-मृत्यु, सुख-दु:खे ही सारी त्या भ्रमाची च लेकरे आहेत. जेथे धर्म तेथेच जय. ज्या ज्या हृदयी धर्म तोच महात्मा. तो महात्मा आपल्या आत्मानंदांत नित्य राहातो. तोच परमात्मा. नित्य ऐश्वर्यवान, नित्य प्रसन्नात्मा, नित्य आनंदाच्या स्वच्छ प्रकाशात तो सुस्नात होत राहातो. पण अहकारपूर्ण भोग बुध्दी ने मानवाचे जी वन नासते. कलंकित होते. असे असले तरी अंतरंगी चा परमात्मा हा नित्य होता तसाच राहातो. त्याच्या अंतर्यामी कर्माची सत्ता नसते. कर्माची सत्ता ही नित्यस्थिती नाही कारण तिचा संबंध पुद्‌गलाशी -कर्माची आहे. असे असूनही भ्रमपूर्ण अज्ञानमय अवस्थेमुळे जीवाचा संसार प्रसन्न, सुंदर होत नाही . लाखो जी वनाती ल एखादेच जी वन उजळून निघते.

या संसार समुद्रात एकच दीप उजळत असतो-तो ज्ञानदीप. त्याच्या प्रकाशात वाट चाल करुन महात्मे सुखी होतात. कारण भोगात ते अडकत नाहीत, कर्मप्रदत्त सुख-दु:खाशी ते नाते जोडत नाहीत. त्यागमय जीवनाचा स्वच्छ प्रकाश हृदयी पेटला की अशांततेचा, भोगाचा अंधार तेथे राहात नाही. आत्म्याच्या प्रकाशात अहंकार,अहं-बुध्दी, कर्तृत्व-बुध्दी राहात नाही. सारे परमात्ममय होऊन जाते. मी -तूचा भेद पण राहात नाही. अशी तेजस्वी, प्रखर समता हृदयांत जागृत होते की तेथे द्वैत उरतच नाही.

या कथनाच्या स्पष्टी करणासाठी कौरव-पांडवाची कथा मोठी उद्बोधक आहे. कौरवांची प्रकृती पापमय आहे. अहंकाराचे विविध नमुने कौरवांच्या ठायी दिसून येतात. या उलट पांडवांच्या ठायी शुभ प्रवृत्तीचा वारसा आहे. शुभ आणि अशुभ अशा दोन प्रवृत्तीचा संघर्ष म्हणजे महाभारत. सत्वशीलता एकी कडे तर अहंकारमयता, असमंजसता दुसरी कडे. दोघेही एकाच कुटुंबातील घटक. साऱ्यांना समताभावाने एकत्र नांदणे शक्य आहे. प्रत्येकाच्या मूलभूत स्वातंत्र्याच्या प्रवृत्तींना सांभाळून घेऊन वागणे शक्य आहे. परंतु आत्मप्रचीतीचा अभाव, परस्परांशी स्नेहाने वागण्याच्या दृष्टीचा अभाव यामुळे दोघांत युध्दाची ठिणगी पडते.

धर्म संगरी नुरे अहंता । तिथेच शांती तिथेच समता ।।
समता ममता स्वतंत्रता ती । जिवा जिवा दे आत्मप्रचीती ।। 6

जगी झुंजती आत्मवैरि ते । कुणी क्रूर ते कुणी शूर ते ।।
धर्म शूर ती पांडवसेना । धुळीस मिळवी कुरुसैन्याना ।। 7

कौरव पांडव धर्मयुध्द ते । धर्म तिथे जय जगास कळते ।।
भीष्म पितामह प्रसन्न आत्मा । विश्वप्रपंची शूर महात्मा ।।
पिता तयाचा शूर सद्‌गुणी । परि न गृहामधि गृहस्वामिनी ।।
वृध्द पित्याने राज्य आपुले । तरुण सुताच्या करी अर्पिले ।। 8

सुत एकुलता वृध्द पिता तो । मन रिझवाया वनी विहरतो ।।

नवी किनारि धी वर कन्या । नाव वल्हवी कुणी सुधन्या ।।
तिने जिंकिले चित्त तयाचे । द्विधा चित्त हो वृध्द पित्याचे ।। 9

धी वर कन्या म्हणे राजसा । तुला वरिन मी धरि भरवसा ।।
परि गृही मम माय बाप ते । कथू वृत्त हे सर्व तयाते ।।
शुभआशिर्वादचन धर्म जाणतो । विवाह मंगल पुण्य मार्ग तो ।। 10

असे असले तरि पांडवाचे युध्द हा एक धर्म-संगर आहे. स्वातंत्र्य समता, प्रेमभाव यांची बैठक त्याला लाभली आहे. सत्याच्या अधिष्ठानासाठि वास्तविक युध्द नको असते. परंतु दुष्ट प्रवृत्तिंचा जेव्हा अतिरेक होतो, तेव्हा युध्द अटळ असते. युध्द पांडवांच्या इच्छेविरुध्द लादले गेले. आणि त्या महायुध्दात पांडव सेनेला कौरवांचा पराभव करावा लागला.

कौरव-पांडवांचे युध्द एक धर्म-युध्द होते. जेथे धर्म तेथे जय असतोच. या युध्दातील एक महान योध्दा आहे-भिष्म. भिष्माची कथा मोठि करुण-रम्य आहे. भीष्माने विवाह केलेला नसतो. एकदा भीष्माचे वृध्द वडील शंतनु वनात हिंडत असतांना त्याला एक कोळिणीची कन्या दिसते. ती अतिशय सुंदर, लावण्यवती असते. पण शंतनु असतो वृध्द. तरि ही त्या कोळीणीच्या कन्येचे प्रेम त्या वृध्दावर बसते. ती त्याच्याशी विवाह करु इच्छिते. पण आई-वडिलांच्या अनुमतीची आवश्यकता होती. तिने आपला विचार आपल्या आई-वडीलांना सांगितला, आई-वडीलांना आश्चर्य वाटले. राजकुळातील व्यक्ती असली तरि अशा वृध्दावर भरवसा ठेवणे पित्याला अवघड नाहि.

. . .

धी वर वंदुनि म्हणे राजसा । अम्ही तुझ्यावर ठेवू भरवसा ।।
परि कालगति विचित्र भारि । तिला भीति नित जन संसारि ।। 11

तरुण पत्नि ही वृध्द पती तू । साधणार तुम्हि प्रपंच हेतू ।।
प्रपंचात या मुले लेकरे । ती न वनातील कुणी पाखरे ।।
मान मरातब हवा तयाना । राज्य छत्रही हवे तयाना ।।

परि आज तव राज्य धुरा ती ।अम्हि जाणतो तुझ्या न हाति ।।12

तू नच राजा तेवि प्रजा पण । अम्हि आपुले सर्व प्रजानन ।।
प्रजाजनाच्या मनात भिति । हवे राज्य पद हि च विनंती ।। 13

वि न वृध्द ते जन संसारि । दु:ख भोगिति प्रपंचि भारी ।।
प्रपंचात ना समता ममता । दु:ख भोगवि स्वराज्य सत्ता ।। 14

दु:खित राजा गृहि पातला । कामवासना भ्रमवि तयाला ।
भिष्म पित्याचे दु:ख जाणतो । आणि प्रतिज्ञा सवेचि करितो ।।
ब्रम्हचर्य व्रत वरिन भूवरि । सान बंधुची करिन चाकरि ।।
आज पासुनि मी नच राजा । परि प्रजेच्या येईन काजा ।।
राजा राणी राज्य सुखी जगि । ब्रह्मचर्य व्रत विषयि विरागी ।। 15

धी वर भी ष्माच्या पित्याला, शंतनुला, धी वर म्हणाला. घ्आपणाङ थोर आहात. शूर आहात, पण माझी मुलगी तरुण आहे. आपण वृध्द आहात. संसारिक हेतू आपल्याकडून कसा पूर्ण होणार ? आणि हिच्यापासून झालेल्या मुला-मुलींना आपल्या कुटुंबात कसले स्थान मिळेल ? हि न कुटुंबाती ल म्हणून ती हिणवली जाती ल. जर आपणाला मुले झाली च तर त्यांनाहि वाटेल की आम्हांस राज्य मिळावे. पण अगोदरच आपल्या तरुण मुलाला राज्य दिले. आता तुझ्या सकट आम्हि त्याचे प्रजाजन, तुझ्या या नूतन कन्येपासून संभवणाऱ्या मुलांना राज्यपद देऊ देणार नाहि . तो कोळि व्यवहारि होता. त्याने वृध्द राजाला सांगितले की तू अगोदर आपल्या मुलाची सम्मती मिळव.

वृध्द राजा दु:खित झाला. तो राजधानिला परतला. कामविकारांनी त्या वृध्दाचा चेहरा आणखी न्च उदास झाला. मानवाचे जी वन मोठे विचित्र आहे. वृध्दत्व शरि राला आले तरि विकाराचे तारुण्य कांहि संपत नाहि . विकारांना नवी न खत-पाणी मिळत जाते व ते नव्याने वहरू लागतात. शरि राच्या वृध्दत्वाचा स्पर्श विकारांना होतोच असे नाहि .

वडिलांची ही स्थिती भी ष्माला पाहवत नाही . वडी ल उदास कां आहेत, याचा तो शोध घेतो. सारी परिस्थिती त्याच्या ध्यानात येते. तो पिताजीं ना सांगतो, माझ्यामुळे आपल्या विवाहाला व्यत्यय येतो आहे, हे मी समजतो, परंतु आपणासमक्ष अशी प्रतिज्ञा करतो की त्या कोळी णी ला विश्वास वाट ावा व तिच्याच मुलाला राज्य मिळावे म्हणून ती अजन्म ब्रह्मचर्य व्रत पाळी न. आपण खेदखिन्न होऊ नका. आपणाच हे राज्य चालवावे. असे म्हणून त्याने वडिलांच्या चरणावर डोके ठेवले. विवाह झाला. पुत्राने पित्यासाठी ब्रह्मचर्य स्वी कारण्याची ही अनोखी बेजोड कथा केवळ महाभारताची च निर्मिती .

तरुण विरागी वृध्द प्रपंची । विषमताच ही जगास जाची ।।
जाच जगाला जाच जिवाला । जिवा जिवातिल पराभवाला ।।
एक च कारण काम वासना । ब्रह्मचर्य व्रत प्रेरि सद्‌गुणा ।। 16

धी वर कन्या महाराणी ती । उदरि तियेच्या पुत्र संतती ।।
कौरव पांडव तिचेच नातू । भी ष्म पितामह स्वधर्म सेतू ।।
जिथे असेना स्वधर्म सत्ता । तिथे न समता तिथे न ममता ।।
कुटुंब किंवा राज्य असो ते । विरोध बुध्दी तिथेच गमते ।।
जगि अविरोधी आत्मशक्ति ती । धर्म तिथे जय पुण्य प्रची ती ।। 17

प्रपंच संभ्रम महा घातकी । पुण्यवंत ही होति पातकी ।
तिथे प्रबळ ती विषय वासना । जगी भ्रमविते भल्या भल्याना ।। 18
धी वर कन्या तरुण अज्ञ ती । परी सूज्ञ तो वृध्द प्रजापति ।।
तरी प्रगट ले पशुत्व तेथे । काम मोहिनी भ्रमवि तयाते ।। 19

काम वासना नव्हे प्रेम ते । प्रेम जिवाला प्रसन्न करिते ।।
प्रसन्न जी वन धर्म मार्गरत । भी ष्म सुखे वरि ब्रह्मचर्य व्रत ।। 20

एकी कडे सामर्थ्यवान तरुण भी ष्म हा ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करतो, तर दुसरी कडे एक वृध्द नव्या प्रपंचात स्वत:ला अडकवून घेतो सारे विचित्र. हाच तर संसार. इथे

वैचित्र्यच वैचित्र्य. चेतनेचे मनोरम आविष्कार. वैशम्य व समता दोन टोके. वैशम्याचे चटके खात खात मानवी मन त्यात कां रमते हे शाश्वत कोडे आहे. विरागतेचे एक टोक तर भोगलालसेचे दुसरे.

ब्रम्हचर्याचा आनंद एकी कडे तर भोगवासनेचा क्षणिक जराजीर्ण आनंद दुसरी कडे.

ती धीवराची कन्या आता महाराणी झाली होती. तिचे एक स्वप्न साकार झाले होते. तिच्या पोटी सुदैवाने अनेक पुत्र जन्माला आले, कौरव-पांडव तिचेच नातू. भिष्म मात्र या साऱ्यांचा सेतू होऊन राहिला. प्रपंच आणि परमार्थ यांना असा सेतू आवश्यक असतो. प्रपंचात व परमार्थात विरोध येतो तो विषमतेने, असमतेने, मोहाने. मात्र आत्मशक्ती जागी झाली की ती सर्व विरोधातही सदैव प्रफुल्लित होते. हाच धर्म आणि तेथेच जय.

प्रपंचातील पुण्य-पापाचा संभ्रम हा घातक असतो. असे पाहायला मिळते की पुण्यवंत आपल्या पुण्याने प्राप्त ऐश्वर्य, सत्ता आणि भोगलालसा यामुळे पापाचरण करतांनाही आढळतात. पापात्मक आचारविचारांना पुण्याचे पाठबळ मिळाल्याचे दिसून येते.

ती धीवराची महाराणी मुळत: अज्ञानी. तिला राजकुलातील संस्कार काय माहिति? परंतु शंतनु हा वृध्द असला तरी तो सूज्ञ असतो. संस्कार त्याला पूर्णत: सोडून जाऊ शकत नाहीत. असे असताही मोहाच्या तीव्र आक्रमणा काळात त्याच्या सर्व सु-संस्कारांचा बळी जातोच. वासना बंड करुन उठते. त्या प्रखर वासनाकांडात ते सर्व सुसंस्कार बळी जातात. तरी परंतु प्रेमाची महतीच अशी असते की जरी ते सुरवातीला शारिरिक स्तरावर अडखळले, तरी त्या प्रेमानेच माणूस जागा होतो. त्या प्रेममय परमात्म्यातून विश्वप्रेमाच्या प्रेरणा जाग्या होतात. आपल्या गुणवान पुत्राच्या ब्रह्मचर्याच्या प्रतिज्ञेने त्या वृध्द राजाच्या हृदयांत हळुहळू परिवर्तन घडत राहाते.

राजकटी ला शाप दुहीचा । घात इच्छिती बंधु बंधुचा ।।
कौरव पांडव जरी बंधु ते । राज्य वाटुनि मागत होते ।।
समान वाटप तत्व खरे पण । पाच बंधु ते शंभर आपण ।।
स्वार्थ बुध्दि ही अति अविचारी । पाच पांडवा जाळुनि मारी ।।
परी न मेले गुप्त जाहले । पुनः प्रगटता युध्द प्रगटले ।। 21

कौरव पांडव युध्द पेटता । मनांत भ्याली स्वधर्म सत्ता ।।
पाच आणि ते शंभर सारे । कुलवंताची सर्व लेकरे ।।
स्वार्थ कर्दमी का मग रुतती । परस्पराचा घात इच्छिती ।।
नव्हे धर्म तो ती नच सत्ता । नव्हे पराक्रम नच मानवता ।।
तिथे झुंजते आत्म शक्ति ती । धर्म तिथे जय पुण्य प्रचिती ।। 22

आत्म शक्तिचा प्रभाव भारी । पांडव केवल पांच भूवरी ।।
कौरव शंभर शूर परंतु । मनी तयाच्या अनिष्ट हेतु ।।
अनिष्ट जी वनि इष्ट कोणते । आत्मशक्तिला सदैव कळते ।।
म्हणुनि झुंजते जनी आणि वनि । आणि मिळविते विजय रणांगणि ।। 23

मरोत सारे उरो सत्य पण । धर्म तिथे जय तत्व चिरंतन ।।
धर्म धुरंधर प्रसन्न आत्मा । जीव व्हायचा जगि परमात्मा ।। 24

परमात्म्याचे राज्य भूवरी । उद्या व्हायचे युध्द तोवरी ।।
सती द्रौपदी राज्यकन्यका । पार्थ तियेचा भ्रतार होता ।।
परी पापाची म्हणती पत्नी ती । अशुभ अमानुष समाजनीती ।।
एक पती पण अनेक कांता । असाहि तेव्हां समाज होता ।।
त्याच समाजी घडे कथा ही । कथा कशाची मनोव्यथा ही ।।
या वाटेवर उभे सहा जण । पाप पुण्य हे कूट विलक्षण ।। 25

कौरव पांडव ही सर्व एकाच कुटुंबाती ल मंडळी , प्रत्यक्ष बंधूच. पण भावाभावांत प्रेम राहु नये, त्यांच्यात द्वेषाचा, वैराचा परस्परात कलह निर्माण व्हावा अशी जणु नियती ची इच्छाच असते. सर्वच मुले तरुण झाले की त्यांच्या आशा जणु नियती ची इच्छाच असते. सर्वच मुले तरुण झाले की त्यांच्या आशा-आकांक्षाचे क्षिति ज रुंदावते. पण आपआपल्या पराक्रमाने कांही नवी न निर्मिती करुन आकाशाला ठेंगणे करावे असे न वाट ता, पैतृक संपत्ती , अधिकार व राजसत्ता उपभोगण्याची अहमहमिका त्यांच्या हृदयात जागी होते. राजसत्तेचे हे खेळ नित्याचेच असतात. जो सत्तेवर येईल त्याचा पराभव कसा घडवून आणायचा हे प्रतिपक्ष पहात असता त्यांच्याती ल महत्वाकांक्षा संघर्षाला जन्म देते.

कौरव-पांडवानी आपल्या पित्याकडे राज्याची वाटणी मागितली . न्यायबुध्दी ने पित्याने ही मागणी मान्य करायला हवी होती . पण कौरवांच्या प्रेमामुळे त्याला तसे करता आले नाही . उलट भर सभेत द्रौपदी ची विटंबना, तिला जुगाराच्या डावावर लावणे, तिच्या स्त्री त्वाची मानखंडना इ. मुळे कौरव पांडवाती ल वितुष्ठ वाढतच गेले. जुगाराच्या मिषाने सर्व राज्य पणाला लावलेल्या पांडवांना वनवासाने दु:ख स्वी कारावे लागले. या वनवासाचे काळात पांडवांना जिवंत मारण्याचे अनेक प्रयत्न कौरवांच्याकडून केले जातात. परंतु ते सर्व असफल होतात.

घृणा, स्वार्थ आणि सत्तेचा अनावर लोभ यामुळे कौरवांची हृदये सूडाच्या भावनेने पेटून निघाली . मानवजाती ला कलंकित करणारी अनेक कृत्ये त्यांच्याकडून घडली . पण धर्मराजाच्या सहनशी लतेने सुसंस्कारी पणाने त्या सर्वावर मात केली .

जुगार खेळा म्हणुनि जनाला । कुणि न सांगती कळे मनाला ।।
परंतु पांडव द्यूत खेळले । आणि सती ला पणा लाविले ।।
काय करिल ती सति बिचारी । पांडव बंधू अति अविचारी ।। 26

सती द्रौपदी सुशी ल कांता । तिच्या अंतरी विवेक होता ।।
विवेक बुध्दी आत्मशक्ती ती । वलय शक्ती चे तिच्या भोवती ।। 27

विकली कांता षंढ पंडू सुत । जन दरबारि तयास निंदित ।।
कौरव जेते करिति गलबला । इथे बोलवा द्रुपदसुतेला ।।
द्रुपदसुतेची विचित्र दुनिया । इथे नागवी करुनि बघूया ।।
निरि हासडू पहा दुर्जन । शी ल सती चे नच दुर्बल पण ।।
तेज तियेचे प्रगट जाहले । आणि अंधसुत होति आंधळे ।। 28

शी ल उजळले शुध्द बाधला । आणि निघती ते वनवासाला ।।
भूप कालचे आज भिकारि । निर्विकार मति जन संसारि ।।
पाप कालचे आज बाधते । पुण्य उद्याचे पुढे साधते ।।
तेच भिकारि होती ल राजे । रक्त रिपूंचे प्राशुनि ताजे ।।
त्या रक्ताची जगी राजवट । विचित्र ऐसा जगि जी वनपट ।। 29

वनवासाती ल काल सुखाचा । मुनी जनांच्या सहवासाचा ।।
दु:ख मनातिल जळून जाते । उपदेशाने ज्ञान लाभते ।।
ज्ञान दृष्टि ला गमे नवे जग । राज्य हानिची उरे न तगमग ।।
प्राप्त कर्म मग देइ चेतना । तिथे पाप ना पुण्य ना ।।
अती त त्याहुनि आत्म प्रचिती । नाव तियेचे धर्म जागृती ।। 30

आत्मजागृती च्याक्षणी विवेक, संयम आणि समता जागृत होते. एकी कडे शंभर कौरवांची कूटनी ती , पाशवि बळ, विषयी भी लाषा आणि दुसरी कडे शांत, प्रशांत, प्रेम,कारुण्य व समंजसपणा हेच द्वैत, युगानुयुगे चालू आहे. घरोघरी , समाजा-समाजात, राष्ट्राराष्ट्रात महाभारताचा वारसा चालत आहे. म्हणून महाभारताचे जे युध्दक्षेत्र आहे त्याला धर्मक्षेत्र म्हट ले आहे ते यासाठि की तेथेच निर्णय व्हायचा आहे की सत् काय ? असत् काय ? धर्म काय ? अधर्म काय ? पुण्य काय ? पाप काय ? युध्दात ठरायचे आहे की कोणती प्रवृत्ती जगी उरली पाहिजे. धर्माचा जय होतो की नाही , सत्य तावून सुलाखून बाहेर येते की नाहि , याचा न्याय-निवाडा त्या रणक्षेत्रावर होणार असतो.

पण या महाभारताला निमित्त घडले एका सत्वशील स्त्रीचे. द्रौपदीवर घडलेला अन्याय हे कुणाही विवेकी, सुविचारी व सत्वशील माणसाला चीड आणणारा आहे. ती महाभारतातील एक तेजस्वी स्त्री आहे. ती एकाची पत्नी असता, ती पाचही पांडवांची पत्नी आहे, असा प्रवादही कौरवांनी केला. इतकेच नव्हे तर तिला उपभोगण्याचा आपणाला हक्क आहे, नव्हे तो आम्ही बळजबरीने उपभोगू अशी चीड आणणारी नीच कल्पनाही त्यांनी प्रत्यक्षात आणण्याचा घाट घातला. पुरुषत्वाला षंढत्व येते आहे, बेगडी बंधुप्रेमाचे, धर्म प्रतिपालनाचे नाटक घडते आहे, असे वाटताच ही स्त्री एका प्रचंड विद्युल्लतेचे रुप धारण करते. स्त्रीलाही आत्मा आहे, तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे, ती परमात्म्याची शक्ती आहे. तिला विकणारे, तिला भोगदासी बनवू इच्छिणारे किती ही मोठ्या कुळातील असले तरी ते शूद्र आहेत, अधमपापी आहेत, असा दावा ती भरसभेत करते. आणि पांडवांना शूरत्वाचे, निर्भयत्वाचे व स्त्री-प्रतिष्ठेच्या रक्षणाचे आवाहन करते.

द्रौपदीला कृष्ण सहाय्य करतो. हे रुपकही मोठे करुणरम्य आहे. मानवजात जेव्हा स्त्री प्रतिष्ठा संरक्षण करु शकत नाही, तेव्हा तिच्याच हृदयात परमात्मा जागा होतो. त्या परमात्म्याचे विराट स्वरुपाने कृष्ण तिला मदत करतो. कृष्णरुप हे महाभारताचे एक स्वप्न आहे. शाश्वत स्वप्न. परमात्म्याची नित्य प्रतिक्षण जाण, त्याच्याशी एकरुपता, त्याचेच होऊन राहाणे, सारा अहंभाव, सारे विकार-संकल्प त्याच्याच चरणी वाहून टाकणे हे द्रौपदी जाणते. ती प्रभूमय होऊन जाते.

पण समाज द्रौपदीला पाचाची पत्नी मानत राहातो, त्यावर चर्चा करीत राहतो. त्या सामाजिक निष्ठांचा अर्थ काढीत राहतो. पण समाज हे जाणतच नाही की तीही एक परमात्माच आहे. बाह्य-आचार-विचारांनी परमात्मा बदलत नाही. तो तर नित्य-नूतन, जागती-जाणती पेटलेली चैतन्य ज्योतच आहे. त्या परमात्म्याचे दर्शन, त्याचेस चिंतन, त्याचेच ध्यान हा त्याचा छंद फार मनोरम प्रसंग महाभारताने उभा केला. प्रभूचे रुप न पाहू शकणारा अंध धृतराष्ट्र. द्रौपदीचे वस्त्र हरण करणारा दुर्योधन, दु:शासन आणि स्त्रीत्वाचे सत्व-शील रक्षणकरणारा कृष्ण याहून मधुर प्रसंग तो कोणता ? धर्म-अधर्माचा निवाडा करणारी महान कथा म्हणजेच महाभारत.

सती चे शी लाला द्यूतावर लावणाऱ्या धर्मराजाला वनवास घडतो. पाचही पांडवांना त्या द्यूत-पापाचे प्रायश्चित भोगावे लागते. पाप-प्रवृत्ती ची पाऊले अधम मार्गानेच जातात. विनाशापली कडे त्यात कांही एक नसते. जे आज दुसऱ्यांचे रक्त प्राशन करण्यात, त्यांचा नाश करण्यात उद्युक्त आहेत, तत्पर आहेत, त्यांचेही रक्त प्राशन करणारे जन्मणारच आहेत. भूमिका करणारे बदलतात, भूमिका त्याच त्याच राहतात. कालाच्या प्रचंड प्रवाहात त्या भूमिका रुप बदलून येतात, भूमिका पार पाडणारे नवे नवे चेहरे, नवे नवे रुपडे पुनः पुन्हा जन्म घेत राहातात. रक्तरंजित राजक्रांत्या होत राहातात, युध्दे होत राहातात, पण माणूस त्यापासून कांही शिकत नाही , हीच तर विश्वाची समस्या आहे.

अशा री ती ने पांडवासारखा शक्तिमान, शूर व गुणसंपन्न व्यक्तींना देखी ल वनवास भोगावा लागला. त्या वनवासालाही मंगलमय बनविण्याची , त्यातूनही मने उत्तुंग बनविण्याची , भविष्य काळाला दी प्ती मय करण्याची किमया सज्जनांना करता येते. मुनी जनांचा सहवास तेथे लाभला. त्यांनी दिलेली जी वनसृष्टी निर्मल झाली . राज्य गमावल्याचे दुःखही ते हळूहळू विसरुन गेले. दुःखाची जातच अशी आहे की कुरवाळायला मानवाला आवडते. संसार म्हणजे दुःख असे जरी सारे ऋषी -मुनी सांगत आले असले तरी आज नाही , उद्या तरी सुख मिळेल अशा अनावर आशेने मानव दुःखे भोगतच राहतो.

पांडवांच्या ह्रदयात विवेक जागा झाला. त्यांची चेतना जागृत झाली . कर्माच्या फलांची आशा न करता शांतपणे, निश्चिंतपणे कर्म करी त राहण्याचा कर्मयोग ते करी त राहिले.

धर्म जगाचा धर्म जिवाचा । जिवाजिवातिल गुण कर्मांचा ।।
वनी विहरता कळे अंतरी । सृष्टि शिक्षिका साह्य तया करि ।।
वेली वरची फुले बिचारी । दोन दिसाची संगत सारी ।।
प्रेम करावे कसे न कळते । वैर कुणाशी मुळी च नसते ।।
तरी तोडिति मानव प्राणी । जी व घेणि ही कर्मकहाणी ।।32

जलांत मासे जी व जागते । जी वन त्याचे जला भोवते ।।

नच भूमी वर पाय ठेविती । परी नसे सुख नसेच शांती ।।
येउनि मानव घालित जाळे । मरण पाहती उघडे डोळे ।। 33

सुंदर हरिणी आणि पाडसे । वनी विहरती अति उल्हासे ।।
धर्म अहिंसा कर्म अहिंसा । परी क्षणाचा नसे भरवसा ।।
तिथेच येती व्याघ्र सिंह कुणि । करिती गिळंकृत भक्ष्य म्हणोनी ।।

व्याघ्र सिंह तरि कु ठे सुखी ते । फिरती शिकारी तया भोवते ।।
तया मारुनी शूर म्हणविती । रणशौर्याची अशी च री ती ।। 35

धर्म कुणा एकाचा नाही , एका संप्रदायाचा नाही , केवळ मानव समूहाचा नाही . धर्म सर्व यच्चावत जी वांचा आहे. शुध्द वेगवेगळे आहेत, अनुभूती मात्र सर्वत्र सारखी आहे. कारण जी वनाती ल परमात्मा एकाच स्वरुपाचा आहे. सृष्टी च्या सान्निध्यात पांडवांना हे पाठ मिळाले जे कु ठेही मिळत नाही , ते पाठ केवळ निसर्ग देऊ्न जातो. वृक्षावरी ल फळे-फु ले म्हणजे सृष्टी ती ल प्रेमतत्त्वाचा बहर, परिपूर्णतेची एक शाश्वत अवस्था. अशा सृष्टि ती ल चैतन्याला न स्विकारता त्या चैतन्याची शाश्वत मूल्ये न जाणून घेता मानव परस्परांचा नाश करण्यास उद्युक्त होतो. हे च विश्वाची खरी समस्या आहे.

जलाती ल मासे, सुंदर सुंदर हरिणी , आकाशात स्वैरपणे फिरणारे पक्षी हे कुणाशी ही वैर करी त नाही त. परंतु मानव मौजमजेसाठी , आपल्या स्वादासाठी त्यांचा नाश करतो. सिंह-व्याघ्र या सारख्या क्रू र प्राण्याला मारुन जणु आपण फार शूर आहोत असा भास निर्माण करतो. परंतु ही सारी जी वसृष्टी या अनंत विश्वाती ल एक भाग आहे. त्यांच्या असण्यात एक वैश्विक समतोल आहे, एक वैश्विक सामंजस्य आहे हे जाणत नाही . त्यांच्या नाशाने दुसरी कोणती तरी आपत्ती आपण ओढावून घेत आहोत याचे भान त्याला राहात नाही . अहिंसा तत्व तर त्या वैश्विक सामंजस्याची केवळ उद्घोषणा आहे. कुणाला मारुन जगण्याची री त संपूर्ण विश्वाला धोकादायक आहे, असेच अहिंसा सांगत आली आहे.

कौरव पांडव आप्त बंधुजन । वैर तयाचे महाविलक्षण ।।
कुणी विलासी कुणी वनवासी । विजयि व्हायचे धर्म तापसी ।। 36

विजय रणातिल नव्हे नामव्रत । नव्हे उपोषण ती र्थ क्षेत्र पथ ।।
नव्हेच पोथी नच पारायण । इष्ट देवता प्रणाम पूजन ।।
कर्तव्याची प्रखर प्रतिष्ठा । समाज सन्मुख स्वधर्मनिष्ठा ।। 37

वनवासातिल उदास वृत्ती । बनवि मानवा जगि परमार्थी ।।
परमार्थि मन विवेकवावे । स्वभाव सुंदर सुख संवावे ।। 38

मुनी जनांची घडे संगती । कथा पुरातन श्रवणी पडती ।।
जी वन श्रध्दा वनी बळावे । पाप मनातिल जळे स्वभावे ।। 39

पांडव होते राजकारणी । वनी पातले जुगार खेळुनि ।।
जुगार म्हणजे लाभ अचानक । तशी च हानी उरे न लौकिक ।।
परी अलौकिक वनवासी मन । सदा शांतता उदान्त जी वन ।। 40

पांडवांच्या वनवासाने कौरवांना सुख मिळाले असे वरुन वरुन दिसले तरी पांडवांची भी ती त्यांना सुखाने राज्य करु देत नव्हती . पांडवांचे भूमी वरी ल अस्तित्व त्यांना नको होते. कौरवांच्या ह्रदयाती ल शल्य होते पांडव. त्यामुळे राज्य करतांना देखी ल त्यांची मने भी ती ने गारठलेली होती .

युध्द करुन किंवा लांडी लबाडी ने फसवून पांडवांना मारुन टाकण्यासाठी कौरवांनी अनेक युक्त्या योजल्या. समर-धर्मात न बसणाऱ्या अनेक योजना त्यांनी आखल्या. परंतु त्या सफल झाल्या नाही त. वैरभावनेला अंत नसतो. त्या भावनेने मन ग्रासून गेले की मग मनाला शांतता लाभत नाही . युध्द जिंकायला केवळ देवाचे नांव घेऊन, जप तप करुन, पोथी -पुराण वाचुन, इष्ट देवतांची पूजा-अर्चा करुन चालत नाही . जी वन ही एक ज्वलंत कर्तव्यनिष्टा असावी लागते. समाजोन्मुख एक अविचल निष्ठा असावी लागते.

वनवासाती ल दिवस जरी ऋषी -मुनीं च्या सहवासात जात होते तरी पांडवांची मने तरी कुठे शांत होती ? तेही राजकारणी होते. राजकारण हा ही एक मोठा जुगारच होता. तडकाफडकी श्री मंत होण्याचा, जाणत्या धर्मभी रुंना गुलाम करुन टाकण्याचा ऐश्वर्य व सत्ता हस्तगत करण्याचा तो एक डाव आहे.

राजनी ती चा हा जुगार युगानुयुगे चालतच आहे.

उदात्त मतिला कळे सत्य ते । जी वन जगती कसे विलसते ।।
जी वन म्हणजे नित्य रणांगण । हवे भुकेला नवे भक्ष पण ।।
भक्ष भक्षुनी ढेकर देतो । आणि वानिति जी वन तृप्ती ।। 41

एक जगाया सहस्त्र मृत्यु । अंति जगेना तोहि परंतू ।।
ही च जगातिल विचित्र ली ला । दृष्टि पडे नित साधु जनाला ।।
म्हणुनि मृत्युला ते नच भी ती ।आणि चिंतिति सदैव शांती ।।
शांति तिथे सुख तो तर आत्मा । जी व व्हायचा जगि परमात्मा ।। 42

परमात्म्याच्या जवळ असावे । हे वनवासी जनास ठावे ।।
तिथे न तंटा तिथे न भांडण । तिथे न कोठे वैर विलक्षण ।।
परी पांडवा हे नच रुचले । कौरवकंदन तयास सुचले ।। 43

जी व जी वाचा शत्रुमित्र की । प्रश्न पडे हा सदा लौकिकी ।।
अंश जिवाचे सदैव भांडण । वंश जिवाचे ते रणकंदन ।।
अंश वंश ही जगि विधिघटना । कुणी कुणाला आप्त मानिना ।। 44

जगात जी वन कणाकण स्फुरते । भवसागरि या समूळ विरते ।।
विरणे म्हणजे मरावयाचे । मरुनि जी वनी उरावयाचे ।।
उरणारांचा मनोधर्म तो । जित्या जिवाला मार्ग दावितो ।।
त्या मार्गावर साधु आणि मुनि । म्हणुनि माधुरी गमे जी वनी ।।
साधु समागम घडे पांडवा । परि जळफळतो मनांत वणवा ।। 45

पण हे सत्य केवल उदात्त मनालाच जाणवते. राजकारण्यांना हे सत्य कळत नाही. एकाच्या जीवनासाठी हजारोंच्या वध करण्यात त्यांना कांही च वाटत नाही. उलट तसे करणे हाच क्षात्र-धर्म आहे अशी विपरीत बुध्दी त्याला होते. असंख्य मानवांच्या प्रेतांचे ढिगारे पाहूनही त्यांना सत्य उमगत नाही. अहिंसेची सत्ता लक्षात येत नाही. अनेकांचा नाश करुन सत्ता बळकावणारा ही एकेदिवशी त्या मृत्यूचे भक्ष्य वनतो.

हे जे शाश्वत शांतीचे सत्य आहे, हे मोहमय दृष्टीने त्याला दिसत नाही. परस्पर प्रेममय भावनेने हे जीवन अधिक सुंदर बनू शकते, हेच त्या हिंसक सत्ताधाऱ्यांना कुटिल डाव खेळणाऱ्या राजकारण्यांना कळत नाही.

पांडव जरी धर्माचा आश्रय करणारे, विवेकी, ज्ञानी भासले तरी अस्सल राजकारणी च होते. जरी वरुन ते ऋषी-मुनींच्या सहवासात रहात होते तरी अंतरंगातून सत्ताप्राप्तीचे निखारे फुलतच होते. उद्याच्या आशेत मग्न असणाऱ्याला आप्त-इष्ट मित्र वगैरे केवळ शब्दच असतात. त्यांच्या हृदयातील मानव-प्रीतीचा ओलावा सुकून जातो. सत्ता-वैभव आणि उपभोग यांच्या विवर्तात त्याला कशाचेच स्मरण राहात नाही. इतकेच काय पण प्रिय पत्नी, मुले, लेकी-सुना यांच्यातही त्यांना रस उरत नाही. चैतन्याचे एक अशुध्दरुप दुसऱ्या अशुध्द चेतनेच्या रुपाशी भांडण करीत असते. दोघांची जातकुळी तशी फारशी वेगळी नसते. अशी विचित्र रीतच जगताची आहे.

कणाकणाने सर्व सृष्टित उमलणारे चेतनाविश्व त्यांच्या खिजगणतीतच नसते. मरत नाही त तोपर्यंत जगत राहाणे, व जीवनांत मिळेल तितका उपभोग घेत राहाणे व त्यासाठी असंख्य जीवांची हत्या झाली तरी त्यांना त्यांचे कांही वाटत नाही. राजकारण व सत्ता, वैभव याशिवाय त्यांना जीवनात रसच वाटत नाही. या जीवन संगरातून जे उरतात ते पुन: त्याच प्रकारच्या जीवनाशी प्रेरणा देत राहातात.

राज्य आपुले इथेच होते । आणिक होतो जगि जग-जेते ।।
आज निमाले ते जेतेपण । आणि भटकतो बनात वणवण ।।

तनु वनवासी मन सिंहासनि । तिथेच होते युध्द पेरणी ।। 46

प्रसंग हा जगि कुणी आणिला । जरी कांहिसा दोष आपुला ।।
का नच केले कुणि परिमार्जन । असुनि आपुले ते न आप्तजन ।।
जी व जगातिल सर्व निराळे । धर्म संकटी कुणि न आपुले ।।
दंड साहिला दंड करु या । आणि शत्रूवर विजय मिळवू या ।।

कौरव सेना असेल भारी । परी न दुबळे अम्हि संसारी ।।
दिले घेतले फिरुनि देइना । लढुनि घेउ हा क्षत्रिय बाणा ।।
म्हणोत मुनिजन ही जरि हिंसा । धर्म बुध्दिला तिथे दिलासा ।।
धर्म बुध्दी कधि स्वार्थ साहिना । समाज कंटक स्वार्थ साधुना ।।
हवी च शिक्षा हवा दंड तो । रणरंगाला नको खंड तो ।। 48

अम्ही देउं ना चिमूट माती । कौरव बंधू म्हणू लागती ।।
पणा लागते जिद्द जनांची । ही तर नांदी रणांगणाची ।।
रणांत मृत्यु स्वर्ग लाभतो । विजय मिळविता राज्य भोगतो ।।
इथे पराक्रम तिथे पराक्रम । म्हणुनि क्षात्रकुलि हवाच विक्रम ।।
जगि विक्रम गुण अम्हा पाहिजे । गुलामगिरी ती कधी न साहिजे ।।
असतिल कौरव राज्य पदावर । असेल प्रेमहि प्रजाजना वर ।।
नव्हे प्रेम ते तो तर कावा । स्वार्थ बुध्दी चा विसर पडावा ।।
म्हणुनि प्रेम ते ती नच नी ती । ये राज्यांती नरक प्रची ती ।। 50

पांडवांना वाटतच राहिले की आपण एकेकाळी राजे होतो. या माती वर आपला अधिकार होता. पण तो भूतकाळ होता. पुन: युध्द करुन ते गेलेले वैभव, सत्ता, ऐश्वर्य परत मिळवायची ती व्र लालसा त्यांच्या मनात पुन: पेटली . एरी राने वनवास तर मनाची उभारी राज्यउपभोगाची . दुभंगलेले व्यक्तिमत्व ते हेच. त्यामुळेच तर शांतता लाभत नाही . आत एक, बाहेर एक. वनवासातही सिंहासन त्यांच्या पिच्छा करी त होते.

अशा आपल्या संकट काळांत आपल्यामागे कुणी कां उभे राहिले नाहि ? येथे खरोखर कुणी कुणाचे नाही. नसतेच. ज्यांच्याकडे सत्ता, वैभव, ऐश्वर्य त्याच्याकडेच साऱ्यांचा ओढा, हि तर जनरीतच.

कौरवाकडे सत्ता आहे. ते आम्हाला भारी पडतील. त्यांचेकडे शस्त्रास्त्रे, पैसा, जनशक्ती आहे. पण म्हणून काय झाले ? आम्हि पाच पांडव कौरवांना भारि होऊ. त्यांचेकडून युध्द करुन राज्य जिंकून घेऊ. असा विचार पांडव करु लागले. दुर्जनाचा संहार केला पाहिजे, त्यात हिंसा-अहिंसेचा प्रश्नच नाहि. हि तर समर-नीति आहे. सूक्तासूक्त विचार करायचे यात कारणच नाहि. पांडवांची हि विचार सरणी.

कौरवांचा विचार असा की पांडवांना एक इंचभरहि जमिन देण्याचा नव्हता. त्यासाठि तेहि मरा-मारायला तयार होते. कुणाचा भू-प्रदेश ? कुणाचे राज्य ? कोण सत्तेवर येणार ? त्याची सत्ता किति वेळ टिकणार ? मानव याचा विचारच करित नाहि. क्षत्रियांचा धर्म तर युध्द करणे समरांगण हि च त्याची कर्मभूमी. जिंकू तर या पृथ्वीवर राज्य करु. अशा विचारांनी क्षत्रियांनी या पृथ्वीवर सत्ता उपभोगली होती.

राज्य जगातिल कसे असावे । नच नरकातिल किड्यास ठावे ।।
कीटक मुंगी भृंग श्वापदे । राज्य तयाचे जगि होउदे ।।
म्हणेल का कुणि जीव शाहणा । वीर विक्रमी क्षत्रिय बाणा ।। 51

तयास कळते धर्म काय तो । दुष्ट जनाचे वर्म जाणतो ।।
भले बुरे जरि कर्म आचरि ।प्रामाणिकता परि अंतरि ।।
प्रमाण त्याचे म्हणति मुनिजन । धर्म तिथे जय जय न रणाविण ।। 52

धर्म तिथे जय क्षात्र वृत्ति । ति न क्रूरता प्रपंच निति ।।
कुणी कुणाला साह्य करावे । कुणी न कुणाशी वैर धरावे ।।
वैर अहंता दोष अमानुष । जित्या जीवनी कालवितो विष ।।

प्राण घातकी ती विषबाधा । ती न आवरे कुण्या औषधा ।।
औषध त्यावर एक युध्द ते । क्षात्रकुलाविण कु ठे न मिळते ।। 54
धर्म तिथे जय तिथे न भी ती । प्राण आपुले पणा लाविती ।।
प्राणपणामधि शौर्य आगळे । प्राणपणामधि धैर्य आगळे ।।
शौर्य धैर्य ना लढेल कैसा । पाय पांगळे चढेल कैसा ।।
नव्हे पुरुष तो स्त्री ही नव्हे पण । या दोणाहुनि वृत्ती विलक्षण ।। 55

कौरवांची अभिलाशा आणि पांडवाची अमिलाशा यांत फरक तसा नव्हताच. दोघांची अभिलाशा एकाच जातकुळी ची . पांडवावर अन्याय झाला असे महाभारत सांगते. पण पांडवांचेही द्यूत-प्रेम त्यांच्या नाशास कारणी भूत झाले. व्यसनाधी नतेच्या आहारी जाण्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावेच लागणार होते.

दोघेही क्षत्रिय, दोघांचे कुळ एक दोघांची वी रवृत्ती व क्षात्रतेज यांत फरक नव्हता. तरी परंतु पांडवांच्या बाजूला एक सत्याची बाजू होती . आणि त्या एका नैतिक मूल्यावर ते युध्दास सज्ज झाले. धर्म तिथे जय, ही पांडवांची धारणा तर वाट्टेल ते करुन जय मिळवणे हे कौरवांचे धोरण. परंतु तत्पूर्वी-युध्दापूर्वी कांही तडजोड होऊ शकली तर पाहावे म्हणूनच श्री कृष्णाने मध्यस्ती करुन पहिली . पण कौरवांनी ती यशस्वी होऊ दिली नाही . वैराग्नी च्या, द्वेषाच्या मशाली पेटलेल्या असतांना शांततेचा व समजूतदारपणाचा मार्ग सुचणे अवघडच असते. विकारांची प्रबलता, उग्रता आणि त्या विकारांचा स्फोट यामुळे विवेकाचे कांही चालत नाही . विवेकाचा मार्ग शांत, गंभी र व सरळ. पुण्यमयता असेल तरच, किंवा दोघांच्याही हृदयांत प्रेमभाव असेल तरच सहकार्य होऊ शकते. प्रेम हाच खऱ्या अर्थाने जी वनाचे उत्फुल्ल जी वन-संजी वक रसायन आहे. पण प्रेमाच्या मार्गाने जायला खरे दिग्वि जयी क्षात्रतेज लागते. सबूरी ची , थंडपणाची वृत्ती आघात सहन करी त पुढे जाण्याची हवी असते.

बाल नव्हे तो आणि वृध्दही । जिद्द जी वनी कुठेच नाही ।।
धर्म तिथे जय जिद्द पाहिजे । तलवारी चे घाव साहिजे ।। 56

तलवारि वर क्रांती नाचते । तलवारि वर शांति नाचते ।।
शांति क्रांतिची ती तर फुगडि । तिथे न लेणी तिथे न लुगडि ।।
खणाखती किती शस्त्र अस्त्र ते । यश हानी चे गणित व्यस्त ते ।।
तिथे रक्त वा ति यश हानी । भय न बाळगी सैनिक कोणी ।। 57

रणदेवी चा भक्त फाकडा । पडे न त्याचा पाय वाकडा ।।
अंगि बाणली ती रणनी ती । रणासाठि रण कुणि न मानिती ।।
रणासाठि रण हि तर हत्या । सैनिक साधिती रणि सत्कृत्या ।।
सत्कृत्यास्तव लढले पांडव । गाति पुराणे ते रण तांडव ।। 58

कौरव राजे न्याय देति ना । शस्त्रास्त्रासह सुसज्ज सेना ।।
अन्यायाला शरण जायचे । जिते मरण ते प्रजाजनांचे ।।
मना मनामधि कर्मभावना । अन्यायाला शरण जाईना ।।
कर्तव्याची तिथेच चकमक । घडे जी वनी जगी अचानक ।। 59

युध्द भडकते नाश जरी तो । धर्म तिथे जय-दी प उजळतो ।।
युध्द काय ते युध्द कसे ते । धर्म कर्मरत भूति जाणते ।। 60

धर्म आणि धर्ममार्ग यासाठि जिद्द हवी , परिषह, दु:ख, आपत्ती सहन करायची क्षमता हवी . पण हिंसक जी वनात त्यांनां सत्यासत्य ठरवायचे आहे. धर्म-अर्धमाचा निर्णय हिंसेच्या मार्गाने करायचा आहे. युध्दाने सर्व निर्णय लागतात, असा अप्रस्थापित सिध्दांत, असत्य सिध्दांत, त्यांच्या हृदयांत कोरला गेला असतो. शांती आणि क्रांती यांची फुगडि च जणू चालू असते. त्या फुगडि त कोण जिंकला, कोण हरला हे देखी ल विसरले जाते. विश्वात येवढी युध्दे, लढाया, मारामाऱ्या झाल्या. काय तत्व होते त्यामागे ? न्याय ? समता ? बंधुभाव ?

यश-अपयशाचे पवाडे हवेत विरुन गेले. विरुन जातात, अश्रू आणि रक्त वाळून माती त मिळून जातात. त्याच माती वर पुन: पुन्हा अश्रू व रक्त सांडले जातात. त्याचे गणितही कुणाजवळ नाही . हाच मानवतेला लागलेला अभिशाप होय.

पांडवाचे रणनी ती तत्व वेगळे होते. त्यांना स्वत: करिता न्याय हवा होता, हे तर खरेच, पण त्यांही पेक्षा अन्याय, अधर्म पक्षाचा विनाश घडवून आणायचा होता. त्या अर्थाने ते धर्मयुध्द होते. म्हणून त्या पांडवांच्या युध्दाची महती पुराणांनी गायली आहे.

अन्यायाला शरण जावे, हे हिंसेपेक्षाही मोठे पाप आहे. अशाने सत् कृत्याला, सदाचरणालाही मोठा हादरा बसतो. सामान्य जनतेच्या हृदयांत वसत राहिलेल्या म्हणून सत्याचा नाश होतो. सत्य जगविण्यासाठी , दुर्जनांचा नाश करण्यासाठी युध्द जर अटळ असेल तर तेही खेळावे लागते. मानवी जी वनात जी कर्तव्याची , धर्म पालनाची कसोटी ची वेळ आहे ती टाळ्त येत नाही . प्रसंगी प्राण अर्पण करुन ही सत्याचे दर्शन घडवावे लागते. म्हणून कौरव पांडवांचे युध्द ही कर्तव्याची , धर्म पालनाची , बाब ठरली . धर्माचा दी प सतत उजळत ठेवण्यासाठी तेलाला व वाती ला जाळून घ्यावेच लागते. अशा प्रसंगी युध्द हे आपद्‌धर्म म्हणूनही स्वी कारावे लागते.

म्हणोत तिजला मातृभूमि ही । मातृभूमि वर साचत राही ।।
नाशिवंत तुन शाश्वत आत्मा । आणि जी व हो जगि परमात्मा ।।
सत्य कळुनि हे जया वळेना । जक्षी जन्मल्या जिवा जिवाना ।।
जागविते नित परि न जागती । म्हणूनि मृत्तिकेमधि पहुडती ।। 61

रक्त तयाचे अस्ति मांसही । मातृभूमि वर साचत राहो ।।
नवे बी ज ते नवी मशागत । नवी प्रकृती नवी करामत ।।
नव्या पिकाची नित नासाडी । मृत्यु मुखामधि जिवास धाडी ।।
वदन मृत्युचे समर भूमि ती । धर्म तिथे जय जी व जागृती ।। 62

आत्म शक्ती चे स्थान रणांगण । इतिहासाचे पान रणांगण ।।

इतिहासाचा मिळे दाखला । भुकेजलेल्या युध्दभूमिला ।।
रक्त आवडे मांस आवडे । तेवि अस्थिचे मुखि सांगडे ।।
ती च भूमी कां सुजला सुफला । देइ मानवा फुला फळाला ।।
धय धान्याची तिथे न कमती ।कुणी पेरिती कुणी कापिती ।।
कुणी चोरिती जाळिती हि पण । कुणा मिळेना बघावया कण ।।
जगी असे कां गुण माती चा । देह माति मधि मिळावयाचा ।। 63

असतिल कोणी भाग्यवान नर । असतिल कोणी समर धुरंधर ।।
असतिल पापी पुण्यवंत ते । असतिल कोणी थोर संत ते ।।
जगांस सांगे संत वाणिती । कुणि मरणाची धरा न भी ति ।। 64

जित्या जिवानी असे मरावे । चिरंजी व जगि नाम उरावे ।।
विश्व स्वामिनी समर देवता । मृत्यु भयाची तिथे न वार्ता ।।
जिवा जिवाचा मुक्ति मार्ग तो । मृत्यु मुखातूनि सदैव जातो ।।
नश्वर ही तनु तिथेच जडता । जड बुध्दी मधि पाप अहंता ।।
पाप कुणाचे कुणास बाधे । धर्म मार्गही कुणास साधे ।।
पाप हराया हवे रणांगण । धर्म रणांगणि गमे पुण्यधन ।। 65

आत्मतत्व हे शाश्वत, अविनाशी आहे. ही शिकवण सर्वच भारती य संतांनी वारंवार दिली असतानाही जोपर्यंत त्याचा आविष्कार जिवनामध्ये होत नाही , तोपर्यंत अधर्माविरुध्द धर्माला उभे ठाकावेच लागते. चेतना शक्ती तर जी वाला नित्य धर्माकडे नेण्याचा प्रयत्न करते. त्याची दृष्टी सत्याकडे पाहण्यात सूक्ष्म करायचा प्रयत्न करते. परंतु माणूस जागाच होत नाही . तो परस्परांशी भांडत राहतो. रक्त मांसाच्या सिंचनाने धरती कधी च खुश होत नाही . ती पुन: त्यातून नवे नवे विचार व विचारक निर्माण करी त राहते. ही सृष्टी ची करामत आपल्या लक्षात येत नाही . अनेक संत, साधु, ऋषी , ती र्थंकर, प्रेषित जन्म घेत राहतात. ते नवी न उत्साहाने धर्मस्थापनेचा, संस्कृती संवर्धनाचा सारी पाट मांडतात. मानवाला नवी नवी वर्धिष्णु, उत्तुंग ध्येये गाठायला प्रवृत्त करतात. पण युध्दाने त्या सर्व मौलिक मूल्यांचा पुन: पुन: अस्त होत राहतो.

पण माती ही थकत नाही . नवनिर्मिती चा तिचा वाणा ती सोडत नाही , आणी माणूस विनाशाचा मार्ग सोडत नाही . त्या अर्थाने अशाश्वत व शाश्वत यांचेही महाभारत या पृथ्वी वर अनादि कालापासून घडत आहे. धनधान्याने, हिऱ्या-माणकाने समृध्द असणारी धरित्री हजारो हातांनी आपले वैभव लुटवित्ते. सुजलां, सुफलां होऊ न नित्यनूतनतेचे महावस्त्र ती पांघरते; आणी माणूस ते धन-धान्य अधर्मपणे व अधर्ममार्गाने घेतो. सृष्टी - द्रौपदी चे हे महाव्रत मानव अनादी काळापासून फेडण्याचे अधम कार्य करी त आला आहे. एकी कडे धान्याचे साठे तर एकी कडे लक्षावधी बालके, वृध्द आणि स्त्रिया अन्नावी ण तडफत प्राण देत आहेत. ही विषमता, हे हृदयही नता युध्दाला आमंत्रण देणार नाही तर काय ? या विषमतेला मूठमाती देण्याची तयारी देखी ल ही च माती करी त आहे. त्यामाती तच भाग्यवान, दुर्भाग्यवान, पापी , पुण्यवान, समर धुरंधर, तत्वज्ञ इ. सारे त्या माती तच चिरनिद्रा घेत राहतात हा त्या माती चाच गुण असावा.

कांही जिवंत माणसे चिरंजीव होण्यासाठी , आपले नाव अमर करण्यासाठी आपल्या जी वनाचा होम करतात. या विश्वावर स्वामी त्व गाजवणारी समर-देवताच आहे. विविध री ती ने मानवांना प्रेरणा देऊ न ती जणु कांही आपलेच कार्य करुन घेत आहे. शरी र नश्वर आहे. आणि आत्म-तत्व अमर आहे. असेच जणु ती समर देवता सांगत आहे.

समरांगण हेच जणु पुण्यधन आहे, तेथेच सारा पाप-पुण्याचा निवाडा व्हायचा आहे, अशी भावना मानवाच्या मनात उत्पन्न होते.

पुण्यवान जन धर्म जाणती । म्हणूनी मृत्युची तया न भी ती ।।
तिथे शूरता तिथे वी रता । धर्म कर्म रत सावधानता ।।
मरोत पापी उरो धर्म धन । जना मनाचे सरोत दुर्दिन ।। 66

आत्म सूर्य जगि नित तळपावा । विश्व बंधुता भाव स्फुरावा ।।
नकोच भांडण नकोत तंटे । तयासाठि रण विचित्र वाटे ।।
विचित्र तरि ती नव्हे क्रूरता । आत्म यज्ञ गुणि विश्वबंधुता ।। 67

विश्व जयाचे असेल जितके । धर्म कृत्य ते असेल तितुके ।।
रास असो की असो तिथे कण । धर्म तिर्थ जय तत्व विलक्षण ।। 68

कौरव पांडव युध्द भूमिका । एक पातकी मुळी न शंका ।।
जगि शंकित मति विजयि होइना । म्हणुनि निमाली कौरव सेना ।।
विजश्री चे माळ पांडवा । राज्यश्री चा लाभ पांडवा ।। 69

कथा पुराणी कीर्ति गाजते । धर्म तिथे जय जगा सांगते ।।
धर्म तिथे जय धर्म कोणता । हेच कळेना कुणा तत्वता ।।
तूं न चांगला म्हणूनि लढाई । कोण कसा मी माहित नाही ।।
अशा भ्रमामधि जीव गुंतला । कधी व्हायचा कसा मोकळा ।। 70

जोवरि नाही आत्मजागृती । जीव तोवरी भ्रमे भटकती ।।
कुणी करी रण विजय मिळवितो । कुणी सेवि वन विरक्त होती ।। 71

प्रपंच किंवा विरक्त बाणा । तिथे पाहिजे जीव शाहणा ।।
असुनि प्रपंची नच आसक्ती । तीच जाणती विरक्त वृत्ती ।।
रण मरणाचे भय न तयाला । गर्व वाहिना विजय मिळविला ।।
विजय पराजय शद्‌ब दोन पण । दोन्ही अशाश्वत आत्म निरीक्षण ।।
आत्म निरीक्षण नुरे अहंता । आत्म निरीक्षणि एकवाक्यता ।।
धर्म तिथे जय शाश्वत आत्मा । जीव व्हायचा जगि परमात्मा ।। 72

समर-धर्म जाणणारे पांडव मृत्युला कवटाळायला मागे पुढे पाहणारे नव्हते. जेथे शूरता, तेथे वीरता. वीरता तेथे विवेक, सावधानता, जागरुकता/ घ्मरोत पापि उरो धर्मजनड्या भावनेने केलेचे युध्दच धर्मयुध्द होय. त्याशिवाय सज्जनांचे दुर्दिन संपत नाही . दुर्दिन संपायला व नवे जीवन यायला अंतरंगी वा सुर्य तळपला पाहिजे. बालपणापासून बंधुप्रेमाची शिकवण दिली गेली पाहिजे. सहकार्याचे एक

भावनिक विश्व परस्परात निर्माण केले गेले पाहिजे. हाच खरा मानव धर्म आहे. मानव धर्माच्या विस्तारकक्षा वाढतच ठेवल्या पाहिजेत.

जेव्हा असे घडत नाही , प्रेमभाव, सहकारिता, बंधुभाव निर्माण होत नाही तेव्हा युध्द अटळच होते. असे अटळयुध्दही फार समर्थनीय मानता येत नाही . पण कौरव पांडवांचे अति भयंकर युध्द झाले.

श्री कृष्णाचे सहकार्य पांडवांना मिळाले. पण श्री कृष्णाने केवळ सारथ्य केले. पांडवाचे मनोबल वाढेल अशी भूमिका घेतली . खऱ्या अर्थाने कृष्णाला हे युध्द नको होते. कृष्णाची भूमिका जनमानसांत प्रेम निर्माण करण्याची होती . शेवटच्या क्षणापर्यंत व युध्द प्रसंगी ही त्याने हिंसा न करण्याचा प्रयत्न केला. पण त्यात यश येत नाही , असे पाहिल्यावर स्वीकृत कार्य निष्ठेने, प्रामाणिकपणे व सर्व सामर्थ्यानिशी केलेच पाहिजे. मनांत जर मोह असेल, संभ्रम असेल तर स्वीकृत कार्य तडीस जात नाही . ही संभ्रमावस्था अर्जुनाच्या मनांत निर्माण झाली होती . पण कृष्णाने ती दूर करुन या युध्दाची यशस्वी सिध्दता व पूर्णता महावीर्यवान अर्जुनाद्वारे सिध्द करुन घेतली .

श्री कृष्णाला यात उतरण्याचे कारणही तेच आहे. कृष्ण या युध्दाला तात्विक बैठक देतो. युध्दात देखील अधर्म प्रवृत्तीचा (मानवांचा नव्हे) नाश करण्याचा त्याचा आग्रह आहे. राजकीय कारणासाठी लढलेल्या युध्दात धार्मिकतेचे पांघरुण घेण्यास कृष्ण तयार नाही . कधी कधी कपटाला कपटाने, ठोशास ठोशानेही उत्तर द्यायला त्याची सम्मती आहे. अंतिमत: यशाची खात्री ज्या साधनाने होईल ती साधने नैतिक, अनैतिक मानायला कृष्ण तयार नाहीत. कारण भित्रा माणूस अशा खोटया साधनशुचिंतेची ढाल पुढे करुन स्व-कर्तव्यापासून च्युत होण्याचा फार मोठा धोका आहे. मानसशास्त्रीय दृष्टया हे अगदी सत्यही आहे.

शेवटी पांडवांचा जय होतो. जय आणि पराजय याची भलतीच गल्लत नेहमी होते. परंतु विनाश एवढा मोठा होता की जय त्याच्यापुढे ठेंगण्या वाटणे साहजिक आहे. सर्व मानव समूहाला नष्ट करुन दगडाधोंड्यावर राज्य करण्यात कुणाला प्रेम वाटेल ?

बेचिराख प्रदेशावर स्वामित्व गाजविणे म्हणजे प्रेतावर राज्य करण्यासारखे आहे. म्हणून कौरव-पांडवांच्या या युध्दाचा शेवट व त्यानंतरच्या घटना मोठ्या दुख:दायक आहेत. या महान विनाशक व क्लेशदायक युध्दामुळे पांडवांच्या मनात वैराग्याची बीजे पेरणी झाली .

राज्यश्री मिळाली . सत्ता मिळाली . वैभवही मिळाले. पण खरी उपलब्धी म्हणजे पांडवांना प्राप्त झालेली नवीन जीवन दृष्टी
जीवनाकडे स्वच्छपणे पाहण्याचा दृष्टिकोण, हा महत्वाचा आहे.

पांडवांची कथा पुराणात प्रविष्ट झाली . अनेक प्रतिभावंत साहित्यीकांनी , ऋषी - मुनींनी ती ग्रंथप्रविष्ट केली . अनेक नाटकांतून, काव्यातून-महाकाव्यातून या महान कथेची थोरवी गायली गेली आहे. कारण त्या कथेतून मानवी जीवनाचे घडून येणारे दर्शन, धर्म, संस्कृती व समाज यांच्या परस्पर संबंधातून गुंफलेली ही महान कलाकृती युगानुयुगे जनमानसांतही सुप्रतिष्ठित झाली आहे.

ही कथा हेच सांगते की जोपर्यंत आत्मसामर्थ्याची जाण ह्रदयात निर्माण होत नाही , तोपर्यंत कौरव-पांडवांची युध्दे होत राहणार. प्रपंचात असा किंवा विरागी बनून जंगलात राहा. त्याने कांही साध्य होणार नाही . आत्मप्रचीतीचे शहाणपण उदित झाले नाही तर कांहीच प्रगती साध्य होणार नाही . आत्मनिरीक्षण-परिक्षण, आत्म्याशी सतत संवाद यामुळेच खऱ्या अर्थाने जीवनात क्रांती घटित होऊ शकते. त्या अर्थाने ही महानकथेने मानवांच्या मनांत क्रांतीची ठिणगी अवश्य पडेल.

//* खंड 11 वा *

कौरव पांडव युध्द संपले । श्री कृष्णाचे सहाय्य झाले ।।
धर्मराज ये राजपदावर । परी प्रजेमधि दु:ख अनावर ।।
कोटि कोटि जन रणी निमाले । म्हणेल का कुणि मरण चांगले ।।

राज प्रभू कुणि वैर निर्मिती । त्या वैराग्नित सैनिक मरती ।।
असती ल कांता पुत्र तयाना । आणि तयांच्या मायपित्यांना ।।
काय वाटेल असेल चित्ता । असती ल माते शाप देत ती ।।
शाप तयाचा बाधणार ना । धर्म गमे मनिं उदास वाणा ।। 1

श्री कृष्णाचे कुशल कळावे । उदासी न मन प्रसन्न व्हावे ।।
दूत धाडितो करुनि तातडि । उभी कर्म गति तिथे रोकडी ।।
कृष्ण निमाला जळे द्वारका । वैर बांधते तिथे न शंका ।। 2

वैर बाधते शाप बाधतो । धर्मराज मनि दु:खित होतो ।।
दु:ख मनातिल कुणा कथूं मी । धर्म चिंतितो अंतर्यामी ।।
अंतर्यामी स्फुरे विरक्ती । आणि मावळे उदास वृत्ति ।।
अपूर्ण हे जग तिथे सौख्य ना । कळुनि जी व कां तिथे शाहणा ।।
पुन: गुंततो पुन: गुंततो । पुन: पुन: कां दु:ख भोगितो ।।
दु:ख हराया त्यजूं राजपद । राजविलासी मोह आणि मद ।।
मोह आणि मद मत्सर जाळुनि । मोक्ष मिळविती जिनेंद्र ज्ञानि ।।
नेमी नाथ प्रभू ज्ञान दयाघन । दु:ख आमुचे करिल निवारण ।।
म्हणुनि जात तो शरण तयाला । सवे घेउनी स्व-बंधु मेळा ।। 3

एक वंश वा असो एक कुल । एक वृक्ष परि अमित पुष्प फल ।।
फुला फळांचे दैव निराळे । स्थान मंदिरी कुणा मिळाले ।।
देव घरांमधि प्रभू पुजिती । प्रसाद म्हणुनी सुखे भक्षिती ।।
कुणा बाधते की ड विषारी । गमे भिन्नता जन संसारी ।। 4

जन ससारी गमे भिन्नता । भिन्न भावना प्रपंच वार्ता ।।
प्रपंचातले अस्थिर जी वन । सुख दु:खाचे तिथे येति क्षण ।।
क्षणिक सुखास्तव लग्न मांडिले । लग्न मंडपी प्रिय जन जमले ।।
नेमिनाथ ये प्रवेश द्वारी । मुकी मेंढरे तिथे बिचारी ।।

कशासाठि हे पशु प्रदर्शन । लग्न सुखास्तव सहस्त्र भोजन ।।
मूळ पशूंचे मांस पाहिजे । क्षात्र धर्म अम्हि क्षत्रिय राजे ।। 5

कौरवांचा संपूर्णपणे नाश होऊन पांडवांचा विजय झाला. विजयाचा आनंद नगरांतून साजरा झाला. श्री कृष्णाचे या कामि फारमोठि तदत झाली . धर्मराजाचे राज्य सुरू झाले. धर्माधिष्ठित राज्य हेच भारताचे खरे राजकारण व समाजकारण धर्म म्हणजे प्रजेने सुख, प्रजेच्या इच्छा आकांक्षाचा आदर, त्यांचा सहभाग.

पण या विजयाने प्रजेत मात्र फारसा उत्साह नव्हता, कारण घरा घरांति ल तरुण त्या धारातिर्थि मरण पावले होते. कमविणारे धाडसी , पराक्रमी हातच नाहि से झाले होते. उत्पन्नाचे साधने नष्ट झाली होती . घराघरांतून विधवांची संख्या वाढली होती . मानसिक दैन्य व कुणाचे वैर कुणाला बाधले होते. वृध्द आई-वडी लाचे शाप त्या युध्द खोरांना दिले जात होते. हर विचित्र मानसिक अवस्था पाहून धर्मराजाचे मन खिन्न होणे सहाजिक आहे. एकाच नगरात, एकाच देशात कुटुंबियाप्रमाणे राहाणारे परस्परांच्या जिवावर उठले होते. व त्यात परस्पर प्रेम, सौहाद्र, सज्जनता, सहकारिता, विश्वास बळि गेला होता. ह्रदयांना झालेल्या जखमा पाहावत नव्हत्या.

तिकडे श्री कृष्णा कडे ल वार्ता विचारावि म्हणून धर्मराजाने दूत पाठविले. श्री कृष्णाचे कुशल मंगल कळाले तर तेवढेच मन शांत होईल, असे धर्मराजास वाटले.

दूताने येऊन जे वृत्तांत सांगितला, तो ऐकून तर धर्मराज आणखी नच उदासी न झाला. कारण कृष्णाला मरण आले होते. एक दिव्य विभूति मत्व विली न झाले होते. यादवात भांडणे होऊन द्वारकेची राख रांगोळी झाली होती . एका अर्थाने द्वारकेचे वैभवहि अस्ताला गेले होते. जणु ते वैभव कृष्णाच्या पुण्याईनेच उभे होते. ते लयाला गेले. पुण्य संपले की वैभवहि संपते.

परस्परांति ल वैरभाव व शाप बाधत गेले. धर्मराजाचे मनात वैराग्य वाढू लागले जी वन वैराने नव्हे तर प्रेमाने वाढते, जी वनाचा खरा विकास प्रेममय भावनेनेच होतो.

प्रेमाशिवाय हे जी वन अपूर्ण आहे. जी वनाती ल आनंद, सौख्य अपूर्ण आहे. प्रेमच परमात्मा आहे.

असे असले तरी प्रेमाकडे पाठ फिरवून मानव द्वेषाच्या, क्रोधाच्या अहंकाराच्या आहारी जातो. त्याचा त्याग करुन आत्महिताकडे वळावे असा विचार फार मोठ्या वैय्यर्थाने प्राप्त होऊ शकतो. धर्मराजाचे मनात ही युध्दाची , हिंसेची , द्वेषाची , वैय्यर्थता पटली . व मनाला शांती मिळावी म्हणून राज्यपदाचा मोह, भोगांची लालसा यांचा त्याग करुन भगवान नेमिनाथांचे दर्शनासाठी जाण्याचे प्रस्थान धर्मराजाने ठेवले. नेमिनाथ म्हणजे केवली . दयाधन परमात्माच सर्वाच्या दु:खाचे क्षालन करण्याचे एक आशास्थान. त्या महामानवाचे दर्शन घेण्यासाठी आपल्या सर्व नातलगासह, बधुवर्गासह जायला निघाला धर्मराज. भगवान नेमिनाथ कृष्णाचे बंधु. सर्व संसाराचा परित्याग करू न परमात्म्याच्या दर्शनासाठी घोर तपश्चर्या करणारा महान आत्मा. कैवल्यप्राप्ती नंतर सर्व मानवांचे हिताचा, कल्याणाचा आत्मोत्कर्षाचा मार्ग दाखवित भारतभर भ्रमण करीत होते. जो ठेवा आपणास मिळाला, ज्यामुळे सारे जी वनच उजळून निघेल असा प्रशांत जी वनाचा मार्ग सांगण्यासाठी ते हिंडत राहिले.

पांडवांचे आणि श्री कृष्णाच्या नेमिनाथांच्या कुटुंबाचे सख्य होते. घरोबा होता. पण एक आत्मा परमात्मा बनतो. दुसरा परमात्मा परासक्ती ने परस्परांशी कलह, वैर करुन मरा-मारायला तयार होतो. एकाच झाडाखाली फळे, कांही गोड, मधूर कांही किडकी , कांही सडलेली फु लांचेही तसेच असे घडते ते ते त्या त्या जिवांच्या पुण्य-पापांच्या संचिताने. कुणी कुणास मारु शकत नाही . किंवा जी वदानही देऊ शकत नाही . असे असता महान अज्ञानापोटी परस्परास मारण्याचे, जगविण्याचे संकल्प माणूस करीत राहातो. व त्यातून पुन: नवा संसार, नवी दु:खे उभी राहातात.

या सुख-दु:खांतही प्रत्येकात वेगवेगळेपणा असतो. हा वेगवेगळेपणा कां असतो ? कधी कुणी इकडे सूक्ष्मतेने बघितले आहे तरी कां ? घटना घडत राहातात. त्याकडे आपण कधी फारसे लक्ष देत नाही . हे घडणारच होतं, असं मनांत येत राहातं.

नेमिनाथांच्या जी वनातली ही मोठि लक्षणी य घट ना पहा. घट ना अशी की सारि चैतन्य उर्जाचा एक महाप्रवाह बनला. नेमिनाथांचा विवाह गिरि नगरच्या राजकन्येशी ठरलेले असते. ते लग्न देखी ल श्री कृष्णाने ठरविलेले असते. कृष्णाचा हेतु हा राजकी य होता, सामाजिक होता, व कौटुंबिकहि होता.

नेमिनाथ हे 22 वे तिर्थंकर होते. त्यांचे राज्याती ल अस्तित्व श्री कृष्णाच्या गौरवाला, त्यांच्या महत्तेला बाध आणणारे ठरु शकले असते. म्हणून नेमिनाथांना संसारापासून विरक्ती होईल असा प्रसंग उभा करण्याचे श्री कृष्णाने ठरविले होते. त्यांनी नेमिनाथांचे लग्न ठरविले खरे. पण त्यातहि एक युक्ती केली होती . लग्नाला येणाऱ्या पाहूण्यासाठि म्हणून अनेक पशूंना त्यांनी एका मंडपाच्या शेजारि बांधून ठेवायला सांगितले होते. त्या पशूंचे रुदन नेमिनाथांच्या कानि पडावे व त्या प्राण्यांच्या सुटकेसाठि त्यांनी विवाहाचा बेत रहित करावा व वैराग्य वृत्ती ने संन्यास घ्यावा, अशी ती युक्ती होती .

नेमिनाथांचा रथ गिरि नगरांत प्रवेश करु लागला. सारि नगरि पताका-तोरणांनी सजविलि गेली होती . विवाहाच्या सारि तयारि मोठ्या इमाने-इतवारे करण्यात आली होती .

मार्गाती ल त्या बांधून ठेवलेल्या पशूंना पाहून नेमिनाथांनी रथ थांबविला. आणि सारथ्याला विचारले - च्हे एवढं पशू येथे कां बांधून ठेवले आहेत ?छ सारखि म्हणाला, च्महाराज, आपल्या लग्नाला सर्व क्षत्रिय राजे येणार आहेत. त्यांच्या भोजनासाठि या पशूंना येथे बांधून ठेवले आहे.छ

या एका प्रसंगाने नेमिनाथांचे विचार चक्रसुरु झाले.

मुक्या जिवाचा घेउनिया बळि । भागविती जन भूक आपुली ।।
वरि मिरविती क्षत्रिय बाणा । धर्म कुळाचा म्हणे शाहणा ।।
दुष्ट रुढिहि नष्ट माणसे । विवाह कोठे कुठे बारसे ।।
संसाराची विचित्र ली ला । सौख्य देइना कुणी कुणाला ।।

आत्मसुखाचा जी व प्रवासी । तया हवे सुख जगि अविनाशी ।।
मुक्या जिवाचा नाश साहिना । म्हणुनि तोडितो लग्न बंधना ।। 6

मांस सेविता मद्य पाहिजे । मदिराक्षी चे नृत्य पाहिजे ।।
इथे व्हायचा विवाह मंगल । इथे कृत्य का घडे अमंगल ।।
लग्न सोहळा कांत कामिनी । पुढे व्हायचे पुत्र सद्‌गुणी ।।
मुक्या जिवाची कां मग हिंसा । राजकुलाची नको प्रशंसा ।।
नको बोहले नकोच कांता । नकोत त्या शिरि मंगलाक्षता ।।
संसाराचा त्याग करी तो । नेमिनाथ प्रभु महा मुनी तो ।। 7

लग्न नको मज म्हणे नोवरा । आणि हळहळे मंडप सारा ।।
हळहळणारे जी व अंध ते । नेमिनाथ प्रभु जागृत होते ।। 8

जागृत जी वन आत्म शक्ति ती । आत्मसुखाची जिवास प्रीती ।।
कळे जिवाला कां मज बंधन । बंध तोडिता नहो मुक्त पण ।।
मुक्ति वराया हवे विरक्ती । विवेक वावे विरक्त वृत्ती ।।
जी व विवेकी ज्ञानवंत तो । मुक्तपणे जगि विहार करितो ।।
वृत्ती दिगंबर की र्ति स्वयम्भू । करिति तपस्या नेमिनाथ प्रभु ।।
तपोभूमि गिरिनार पर्वती । पांडवासि प्रभु दर्शन देती ।। 9

कृष्ण आणि बलराम निमाले । आणि द्वारका नगर जळाले ।।
नेमिनाथही बंधू तयाचे । नाश कुलाचा दु:ख व्हायचे ।।
दु:ख साहुनी विवेकवावे । सवेचि रमती सुख संवावे ।।
असत्य हिंसा आणि अधर्म । जी वन खडतर अनादि कर्म ।।
जिवा जिवाला कर्म बाधते । नाश कुलाचा दुष्ट कर्म ते ।।10

च्या मुक्या जिवांच्या वधाने माझा विवाह महोत्सव सुरू होणार आहे. त्यांचे प्राण घेऊन विवाहाचे मंगल सोहळे करण्यात येणार आहेत. दोन जी वांचा नाहक बळी जाणार

आहे. मांसाहारासाठी अनेक मूक पशूंचा वध करणाऱ्यासंबंधी एक तिडिक त्यांच्या मस्तकी शिणशिणली क्षत्रिय झाले म्हणून मासाहार केलाच पाहिजे, असे कु ठे आहे ? शूरत्व, वी रत्व कां कुठे मांसाहाराने येते ? स्वत:चे जिव्हा लौल्यत्व भागविण्यासाठी मूक पशूंचा वध करुन मांसाहार करण्याची ही राक्षसी प्रथा कुठली ? ही काय धर्म-री त झाली ? ही दुष्ट रुढी मानवाने कां चालू ठेवावी ? प्राणी झालेत म्हणून त्यांना कां सुख नको आहे ? जी वन नको आहे? असे अनेक विचार त्यांच्या मनात उसळी मारुन येऊ लागले.

त्यांनी मनात निश्चय केला की हे लग्न वगेरे सारे विधी खोटे आहेत. कुणालाही सुख देणारे नाही त. मांस भक्षणा बरोबर मग मद्य येणार. मद्य आले की मग नृत्य हवे. अशा री ती ने शरी राच्या नानाविध गरजा भागवण्याची व सुखोपभोग घेण्याची प्रवृत्ती होत जाते. विवाहासारख्या या मंगल प्रसंगी अशा अमंगल गोष्टी पाहिजेत कशाला ?

त्यांनी ठरविले की विवाह नको. ती मंगल वाद्ये, त्या मंगल अक्षता नकोत. आणि अशा विवाहापेक्षा, संसारसुखापेक्षा वनवास बरा. प्राची न ती र्थंकरांनी सांगितलेली व आत्मसुखाचा वर्षाव करणारी जिनदी क्षा घेतलेली बरी . असा विचार करुन नेमिनाथांनी रथातून खाली उडी घेतली . आत्मउत्क्रांती चा तो क्षण विजयी झाला. नेमिनाथ नगर सोडून राना-वनांत निघून गेले.

सारी जनता अवाक् होऊन हे दृश्य पाहात होती . हळहळत होती . तळमळत होती . गिरी नगराची ती नवी -नवरी हतबुध्द झाली होती . एका अती व आनंदाच्या क्षणी जणू तिला कुणी तरी एका महान गर्तेत लोटून दिले होते. हे काय झाले ? हे तिलाही नी ट से कळाले नाही . पण घट ना घडून गेली होती . कालचक्राचे काटे आता मागे फिरविणे शक्य नव्हते.

मग तिनेही एक निर्णय केला. सर्व वस्त्राभूषणांचा त्याग करुन एक महासती राजुलदेवी बनून ती ही मनातून वरलेल्या नेमिनाथांचा शोध घेत महालातून बाहेर पडली . सारी गिरी नगरी दु:खात मग्न झाली . लग्नाचा सारा थाट तसाच पडून राहिला. जणु तो सर्व थाट माट म्हणजे एक स्वप्न. पण नेमिनाथ त्या माया-स्वप्नातून जागे झाले होते. जागृत झाले होते. चेतनेच्या उर्जा उर्ध्वगामी झाल्या होत्या.

स्वर्गाती ल देवांनी पृथ्वी तलावर येऊन गिरनारच्या त्या निविड अरण्यात नेमिप्रभूंचा वी क्षा महोत्सव साजरा के ला, गिरी नगरी ची सारी जनता त्या महोत्सवात सामी ल झाली . एका महान विभूती चे आपल्या नगरात आगमन झाले होते. याचे भान त्यांना झाले. एक दिव्य आत्मा आपल्या नगरात विवाहासाठी आला होता, परंतु त्यांचा विवाह लौकिकरी त्या व्हायचा नव्हता. त्यांचा विवाह मुक्ती लक्ष्मी शी जणु व्हायचा होता.

घडले ते घडले, म्हणून सारे पुन: आपआपल्या उद्योगात मग्न झाले. कृष्ण-बलराम इ. सारे व्दारकेला परतले. या संसाराती ल कोणत्याही घट ना सहज घडत असतात. त्या घट नांचेही एक वैश्विक ताळतंत्र असते. एक वैश्विक गणित असते. मानव केवळ एक साक्षी असतो. असे असतांही अमुक एक घट ना माझ्यामुळे झाली , असा अहंकार तो मनात बाळगत असतो. त्यात पुरुषार्थ हुडकत असतो. त्यात त्याचा अहंकार पुष्ट होत असतो. घट ना वैराग्याची असो वा राज्यप्राप्ती ची असो त्या सर्वाहून जी वात्मा सर्वथा वेगळा आहे. अशी जाण न येता, त्या वैराग्यात देखी ल तो घ्मी विरागी ङ्असा अहंभाव पुष्ट करी त असतो.

परंतु नेमिनाथांचा विरक्त हा जाती वंत होता. जन्मोजन्माची साधना त्या वैराग्याच्या पाठी शी होती . त्यांनाही यदुवंशाच्या विनाशाची वार्ता ठाऊक झाली . लोक हळहळत होते तरी प्रभू नेमिनाथ आपल्या स्वत:च्या आत्म्यात ली न होते. सृष्टी चे अनेक परिवर्तने, विनाश-ली ला त्यांनी पाहिलेली होती , अनुभवली होती . त्यातूनच त्यांनी वैराग्याचा मार्ग स्वी कारला होता. कर्म, कर्मबंध व कर्माची फळे ही आत्म्याची नाही त, त्यांचा उदय आला की सुख-दु:खे येणारच. ती आलेली सुख:दुखे समभावाने, साक्षी भावाने जाणणे-पाहाणे हे विवेकी माणसालाच जमते.

धर्म विचारित मुनि राजाला । नाश कुलाचा आज जाहला ।।<br>
आज घडे हे उद्या आमुचे । कांहि कळेना काय व्हायचे ।।<br>
काल आज वा उद्याही उरते । असेल शाश्वत सौख्य कोणते ।।<br>
घडो बोध त्या आत्म सुखाचा । जगद्गुरु तूं प्रभू आमुचा ।। 11

प्रभू बोलती पंडुकुमारा । गमे प्रपंचचि विचित्र सारा ।।
कृष्ण आणि बलराम बंधु मम । प्रपंचात परि उत्तम मध्यम ।।
पहा विचारुनि अंतर्यामी । उदाहरण तूं उदाहरण मी ।।
लग्नमंडपा मधुनि निघालो । परमार्थि मी मनि दुखावलेली ।।
दु:ख प्रपंची तिलाहि कळले । परमार्थामधि अंतर रमले ।।
ती परमार्थि मी परमार्थि । परमार्थावर तुझी हि प्रीति ।।
तूं आणिक मी भेद निरसिता । इथेच स्फुरते निजात्म सत्ता ।।12

निजात्म सत्ता शस्त्र दुधारि । अहं भावना नित्य निवारी ।।
हवे नको मज अहंभावना । मुक्त मुनि मी अहं भावना ।।
मी पण म्हणजे दु:ख शोक भय । आत्म जागृती दे सुख अक्षय ।।
अक्षय सुख तो भाव जिवाचा । अक्षय सुख तो धर्म जगाचा ।।
धर्म मार्ग रत प्रसन्न आत्मा । जीव व्हायचा जगिं परमात्मा ।। 13

परमात्म्याची ओळख होता । जळे मनातिल सर्व अहंता ।।
रुते अहंता दु:ख कर्दमी । कळे न जीवा नित्य मुक्त मी ।।
मी परमात्मा कळेल जेव्हां । विश्व हेचि घर वळेल तेंव्हा ।।
तिथे न बंधन तिथे मुक्तता । जिवा जिवातिल निजात्मसत्ता ।।14

निजात्म सत्ता प्राप्त व्हावया । हवा आत्मगुण अभ्यासाया ।।
अभ्यासाची करु उजळणी । तोच धर्म जगिं निजानंद गुणी ।। 15

नेमिनाथ प्रभूंचाच मार्ग महासती राजुलमती ने स्वीकारला. जिथे प्रभू तिथे मी . जो त्यांचा धर्म तो माझा. प्रभूंचा निमित्ताने जीवनाचे बावनकशी सोने होईल, अशी दृढ श्रध्दा तिच्या मनात निर्माण झाली . तिनेही वैराग्याचा स्वीकार करुन अहिंसा, सत्य, अस्तेय अपरिग्रह व ब्रह्मचर्यादिक व्रतांचा प्रभू साक्षी ने स्वीकार केला. व त्या डोंगरावरील एका गुहेत तिने तपाचा मार्ग स्वीकारला. मातीला फुलांचा सुगंन्ध लागतो. तीही सुरभित होते.

ती तर चैतन्याची रसरशी त पुतळी . तिच्याही आत्म्याचा विकास होत गेला. प्रभू नेमिनाथांना कैवल्य प्राप्त झाले. कैवल्याच्या सूर्याने त्यांचा आत्मा सुप्रतिष्ठित झाला. सर्व जी वनमात्रांचे कल्याण इच्छिणारा आत्मा सत्य मार्ग दाखविण्यास तत्पर झाला. कैवल्यानंतर गावोगांवचे लोक प्रभूच्या दर्शनासाठी येऊ लागले. पांडवाचेही आगमन प्रभूंच्या समवशरणांत झाले. तो ज्ञानसूर्य पहाताच मनातील विषण्णता, खेद दु:ख संताप आणि अहंता गळून गेली .